वायू प्रदूषणामुळे 'फ्लू'चा फैलाव

मुंबईतील रुग्णसंख्येत ३० टक्क्यांनी वाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून मुंबईमध्ये फ्लूच्या रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होऊ लागली असून अनेक रुग्णांमध्ये श्वास घेण्यास त्रास, खोकला, घशामध्ये खवखव, ताप अशी लक्षणे दिसत आहेत. फेब्रुवारीमध्ये फ्लूच्या रुग्णांचा संख्येत साधारण २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली असून, वाढते प्रदूषण त्यास कारणीभूत असल्याचे मत डॉक्टरांनी व्यक्त केले आहे.

वायू प्रदूषणामुळे विविध जंतूंमध्ये पर्यावरणीय आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. खराब हवेमुळे श्वसनाच्या आजारांनी पीडित व्यक्तींना फ्लूसारख्या संसर्ग होण्याची अधिक शक्यता असते. यामुळे श्वास घेण्यास त्रास होणे, खोकला, घरघर व छातीत दुखणे यांसारखी लक्षणे जाणवतात. वायू प्रदूषणाबरोबरच जानेवारी, फेब्रुवारीमध्ये थंडी अधिक असल्याने मागील काही दिवसांमध्ये फ्लूच्या रुग्णांमध्ये २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक रुग्णांना रुग्णालयामध्ये दाखलही करावे लागल्याचे सेंट जॉर्जेस रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनायक सावर्डेकर यांनी सांगितले.

खराब हवेच्या दर्जाचा आरोग्यावर परिणाम होतो. धुके व वायू प्रदूषणामुळे रूग्णांच्या संख्येत जवळपास २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. अनेक व्यक्तींना श्वास घेण्यास त्रास व खोकला अशी लक्षणे जाणवत आहेत. प्रदूषित हवेमुळे फ्लू असलेल्या व्यक्तींला अधिक त्रास होऊ शकतो, अशी माहिती नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील पल्मनरी अँड स्लीप मेडिसीनचे संचालक प्रा. डॉ. सलील

काय काळजी घ्याल

- घराबाहेर पडताना मुखपट्टीचा वापर करा.
- नियमित व्यायाम करावा
- वायू प्रदूषण अधिक असल्यास घराबाहेर पडणे टाळावे.
- फ्लू लस घ्यावी
- ताप, सर्दी किंवा खोकला यांसारखी लक्षणे जाणवल्यास त्वरित डॉक्टरांकडे जावे

विजेच्या धक्क्याने फ्लेमिंगोचा मृत्यू



उरण : बुधवारी सिडकोच्या द्रोणागिरी नोडला जोडणाऱ्या सागरी महामार्ग येथून जाणाऱ्या उच्च दाबाच्या विद्युत वहिनीला धडकल्याने एका फ्लेमिंगोचा मृत्यू झाला. या घटनेमुळे उरण्च्या खाडी किनाऱ्यावर हजारींच्या संख्येने येणाऱ्या विविध प्रजातींच्या परदेशी पक्ष्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशाच प्रकारच्या घटना यापूर्वी नव्हत्या शेवा पोलीस ठाण्याच्या व डोंगरी परिसरात घडल्याचा प्रकार घडला आहे. उच्चदाब विद्युत वाहिन्यांमधील विजेच्या धक्क्याने फ्लेमिंगो पक्षी मृत्युमुखी पडत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. मात्र या फ्लेमिंगोच्या संरक्षणाकडे वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याने पक्षीप्रेमींमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.



लहान मुले व वृद्धांना अधिक धोका

फ्लूची बाधा सर्वच वयोगटातील व्यक्तींना होते. मात्र पाच वर्षांखालील मुले, गरोदर महिला, ६५ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयाचे नागरिक आणि विविध आजारांनी पीडित व्यक्तींना फ्लूची लागण झटकन होण्याचा धोका असतो. प्रौढ व्यक्तींच्या तुलनेत मुलांना प्रदूषक व संसर्गांच्या प्रतिकूल परिणामांचा धोका अधिक असतो. यापासून बचाव करण्यासाठी दरवर्षी फ्लूची लस घेणे आवश्यक आहे.

स्थलांतरित पक्ष्यांच्या प्रजाती धोक्यात

४४ टक्के प्रजातींची संख्या घटली

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : स्थलांतरित पक्ष्यांच्या विविध प्रजाती आणि वन्यप्राण्यांच्या संरक्षणावरील अधिवेशन(सीएमएस) अंतर्गत सूचिबद्ध केलेल्या स्थलांतरित प्रजातींपैकी जवळपास निम्म्या म्हणजेच ४४ टक्के प्रजातींची संख्या कमी होत आहे. पाचपैकी एकापेक्षा जास्त प्रजाती नष्ट होण्याचा धोका आहे. सूचिबद्ध माशांपैकी जवळपास सर्व म्हणजेच ९७ टक्के मासे नामशेष होण्याचा धोका आहे. एवढेच नाही तर सूचिबद्ध नसलेल्या प्रजातीसुद्धा नामशेषाच्या मार्गावर आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आलेला पहिला 'स्टेट ऑफ द वर्ल्ड्स मायग्रेटरी स्पेसीज' अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. उझबेकीस्तान येथे आयोजित वन्यजीव संवर्धन परिषदेत (सीएमएस कॉप १४) प्रसिद्ध करण्यात आलेल्या या अहवालात जमिनीवरील, पाण्यावरील आणि हवेतील स्थलांतरित प्रजातींविषयी माहिती देण्यात आली आहे. ज्या धोक्यात आहेत, त्यातील ७६ टक्के प्रजातींची संख्या कमी होत आहे. ८२ टक्के प्रजाती नामशेष होत आहेत. या धोका जगभरातच आहे. दरवर्षी स्थलांतरी संख्येने पक्षी अन्न मिळवण्यासाठी आणि प्रजननासाठी हजारो मैलांचा प्रवास करतात. परिसंस्था राखण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. वनस्पतींचे परागीकरण, कीटकांची शिकार, पोषक द्रव्ये वाहून नेणे, कार्बन साठवून ठेवण्यात मदत करणे असे अनेक कार्य हे पक्षी करतात. मात्र, मानवांमुळे त्यांचा अधिवास, अस्तित्व धोक्यात आले आहे. या धोक्यांची यादी या अहवालात आहे. पक्ष्यांच्या या प्रजाती वाचवण्यासाठी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कृती आणि देश तसेच संघटना यांच्यात समन्वय साधण्याचे आवाहन या परिषदेत करण्यात आले.

हवामान बदल हा एक गंभीर धोका

अतिक्षोषण आणि नुकसान, ऱ्हास आणि अधिवासाचे विखंडन या सर्वात मोठ्या धोक्यांची यादी या अहवालात देण्यात आली आहे. शिकार, मासेमारी यामुळे अनेक प्रजाती नष्ट झाल्या आहेत. शेती, वाहतूक, ऊर्जा, पाया‌भूत सुविधा यामुळे मोठे नुकसान होत आहे. रस्त्यावरील दिवेसुद्धा पक्ष्यांना विचलित करतात आणि त्यांच्या उड्डाणाच्या मार्गात अडथळा आणतात. याशिवाय हवामान बदल हा आणखी एक गंभीर धोका आहे.



महानंदच्या संचालक मंडळाचा राजीनामा स्वखुशीनेच

अजित पवार यांचा दावा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महानंदमधील सर्व संचालकांनी स्वखुशीने राजीनामा दिला आहे. कोणीही दबाव टाकला नाही. दबाव टाकला असे कोणाला वाटत असेल, तर त्यांनी थेट पोलिसांत तक्रार करावी, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे स्पष्ट केले.

महानंदचा कारभार राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाकडे देण्याचा निर्णय शेतकरी हिताचा असून, राज्य सरकारकडे भागभांडवल म्हणून एनडीडीबीने आर्थिक मदत मागितली आहे. महानंदच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पगार थकले आहेत. त्यामुळे ही रक्कम देण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल. पण हा प्रकल्प गुजरातच्या घशात घातला जाती असा विरोधकांचा आरोप थोडा खोटा असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

एनडीडीबीने २५३ कोटी ५७ लाख रुपयांची मदत राज्य सरकारकडे मागितली आहे, असेही ते म्हणाले. काही वर्षांपूर्वी महानंदचे संचालक म्हणून काम केले आहे. त्या काळात दीडशे कोटी रुपयांची अनामत रक्कम संस्थेकडे होती. मात्र, नंतरच्या संचालकांना संस्थेचा कारभार नीटपणे सांभाळता आला नाही. यापूर्वी जळगावचा दूध संघही राष्ट्रीय दुग्धविकास मंडळास चालविण्यास देण्यात आला होता. हा संघ नंतर तोटपातून वर निघाला. त्यामुळे महानंदचा कारभार सुधारण्यासाठी त्याचा कारभार स्वतंत्रपणे चालवावा, असे ठरविण्यात आले आहे. महानंदच्या संचालकांवर विरोधकांचा आरोप चुकीचा असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

मराठी माणसांनी स्वाभिमान गहाण टाकून महानंद गुजरातला चालवायला दिले आहे, असे म्हणणे पूर्णत: चुक आहे. दुधाचे दर जेव्हा कमी होते तेव्हा दुधाची भुकटी करून या संस्थेला उर्जितावस्थेत आणता येते का, याचा प्रयत्न संचालकांनी करून पाहिला होता. पण तेव्हा संचालक मंडळ कमी पडले, असेही अजित पवार यांनी नमूद केले.

'दुष्काळ निधीचा निर्णय गृहमंत्र्यांच्या बैठकीनंतर'

राज्यातील ४० दुष्काळी तालुक्यांतील पाहणीनंतर राज्य सरकारने केंद्राकडे केलेल्या २२६१ कोटी रुपयांच्या मागणीवर गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळातील सदस्यांची बैठक घेतली जाणार आहे. ही समिती राज्य सरकारने दिलेला प्रस्ताव आणि प्रत्यक्ष पाहणी केलेल्या पथकाचा अहवाल तपासून निधी मंजूर करेल. ही बैठक लवकरच घेतली जाईल, असे शहा यांनी सांगितल्याचे पवार एका प्रश्नाच्या उत्तरात म्हणाले.

राजकीय प्रश्नावर भाष्य टाळले

शरद पवार यांना 'तुतारी घेतलेला माणूस' असे चिन्ह मिळाले आहे असे म्हणताच अजित पवार म्हणाले, 'मग मी काय करू, ते त्यांचं बघून घेतील.' मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी प्रस्तावित मोर्चाबाबत 'योग्य ती कारवाई होईल' असे जाता जाता त्रोटक उत्तर देत राजकीय प्रश्नावर भाष्य टाळले.

दुरुस्ती

सदर वर्तमानपत्रामध्ये दि. २३/०२/२०२४ रोजी झालेल्या ई-लिलाव विक्री प्रकाशित करण्यात आली होती.सदर प्रसिद्धी मध्ये नजरचुकीने **प्रशासक** असे नमूद केले आहे तरी ते **सरपंच असे वाचावे** हि विनंती. संबंधितांनी ह्याची नोंद घ्यावी.

ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक/सरपंच
ग्रामपंचायत वेंडू, ता. श्रीगोंद, जि. अहमदनगर

DCB BANK

नोंदणीकृत कार्यालय: 601 व 602, पेनिन्सुला बिझनेस पार्क, 6वा मजला, टॉवर "ए", सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई-400013.

जाहीर सूचना

दागिन्यांचा लिलाव नि मिसेस सूचना

खाली नमूद केलेल्या ग्राहकांना डीसीबी बँक लिमिटेड कडून (डीसीबी बँक) दागिन्यांच्या अनुदान स्वरूपात तारण ठेवलेल्या सुविधांवरील संपूर्ण देयके प्राप्त करण्याचा सूचना देवूनही त्यांनी देय रक्कम भरणा केलेली नाही. त्यामुळे डीसीबी बँक कायद्याच्या तरतुदीनुसार खाली नमूद केलेल्या ग्राहकांच्या दागिन्यांचा लिलाव करणे आवश्यक ठरत आहे. डीसीबी बँक लिमिटेड कोणतीही पूर्व-सूचना न देता लिलाव करण्याचा हक्क राखून ठेवत आहे. लिलावाच्या तारखेपर्यंत कराराच्या अधिकार आहेत. लिलावाचे आयोजन 06.03.2024 ते 07.03.2024 रोजी दु. 12.00 ते दु. 03.00 या वर्षात https://egold.auctiontiger.net यावर ऑनलाईन करण्यात येणार आहे.

अनु.क्र.	ग्राहक आयडी	ग्राहकाचे नाव	ठिकाण/ जागा
1	1016692932	मोहन यादू जाधव	नवकरगाव

या सुचनेद्वारे सर्वसामान्य जनतेस व ग्राहकास याद्वारे सूचित करण्यात येते की, लिलाव प्रक्रिया आणि सूचना देण्यात आलेले आहे आणि निर्धारित लिलाव तारखेपूर्वी सर्व व्याज व आकार यासह संपूर्ण रक्कम प्रदान करण्याबाबत सुविधांसंबंधित सेवादारे संपर्क देण्यात आलेले आहे, त्यास अशाच्या दागिन्यांचा लिलाव करण्यात येणार आहे. जर लिलाव विक्रीद्वारे मिळालेल्या रक्कम दिलेली पूर्ण शिल्लक सकलन नाही, तर सदर लिलावाचे आयोजन कोणतीही पुढील सूचना न देता अन्य कोणत्याही दिवशी पुनर्लिलाव घेतील. लिलावातील सहभाग व बोलीची संपूर्णतः डिजिटली बँकेच्या एकमेव संकेतस्थळावर असेल.

पुढील वेट मध्ये जी लिलावाचे आयोजन " असे आहे असे असेल", "असे आहे जे काही आहे", "जे काही आहे जिथे आहे" तत्त्वावर लिलाव पद्धतीने करण्यात येणार आहे. लिलावाच्या अटी व शर्ती, त्याच्या तपशील कोणत्याही दावे, वाद, आधार किंवा त्यासंदर्भात लिलाव पश्चात कोणत्याही तिरीने पात्र ठरवार नाही आणि जबाबदार असणार नाही. बोलीदारांनी कृपया लिलावात सहभागी होण्यापूर्वीच संविधान शर्ती व अटींसाठी https://egold.auctiontiger.net या वेबसाईटला भेट द्यावी.

स्था./-
प्राधिकृत अधिकारी,
डीसीबी बँक लिमिटेड

तारीख : 24.02.2024

VISTAAR FINANCE विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि.

नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट न ६४ व ६५, २रा मजला, २७ वा रस्ता, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३. www.vistaarfinance.com

मागणी सूचना

वित्तिय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचयीकरण व अंमलबजावणी अंतर्गत सूचना कायदा, 2002 च्या अंमलबजावणी अंतर्गत सूचना हित कायदा, 2002

बद्दल विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि. (विस्तारफायनान्स) द्वारा सुरक्षित देणदार येते की खालील ऋणको विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि. कडून मालमत्तेच्या अनुदान कर्ज स्वरूप घेतलेल्या आहे आणि त्यांना कर्जाचे हप्ते भरण्यात अयशस्वी झाल्यामुळे त्यांचे कर्ज अनुत्पादित मालमत्ता म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यामुळे सदर ऋणको यांनी दिलेल्या कर्ज सहायक मालमत्तेवर त्यांना देण्यात आलेले कर्ज आणि त्यांच्या व्याजाची पुढील देणी देण्यासाठी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेवर विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि. यांचा प्रभार निर्माण झाला आहे. त्यामुळे कर्जदार यांनी खाली नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरले आहेत,